CS (Main) Exam,2021

मराठी (प्रश्न-पत्र–II)

(साहित्य)

वेळ : तीन तास	कमाल अंक : 250

प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात

आठ प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, त्याचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्नांच्या क्रमानुसारच प्रश्न सोडवावेत. प्रश्न सोडवत असताना उत्तरातील काही भाग लिहिण्याचा राहिल्यास किंवा उत्तरपत्रिकेतील एखादे पान कोरे सोडल्यास तेथे काट मारावी.

MARATHI (PAPER—II)

(LITERATURE)

Time Allowed : Three Hours	Maximum Marks : 250

QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

Please read each of the following instructions carefully before attempting questions

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

Optional Province · optionalprovince.com

SECTION—A

1. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) महदाइसी म्हणितले सृष्टीमध्ये देवो दुर्लभः कां देवाते आठवी तो दुर्लभु : ॥ : शोधु : ॥ : मग तयाते खालि ठेऊनि भिक्षा मागितली : ॥ :

(b) अरे, मी या अभागी दुष्टाने माझ्यावरील अरिष्ट टाळण्याकरितां माझ्या सगुणाचा गळा कापून तिच्या नांदण्याचे चांदणे केले! आता मी हल्ली सालचा शेतसारा द्यावा तरी कोठून?

(c) काव्य खावे काव्य पावे। काव्य घ्यावे सारखे।
काव्य गावे काव्य घ्यावे। बडबडावे अन् मुखे।
काव्य ल्यावे नखशिखी अन्। काव्य घ्यावे मस्तकी।
काव्य छातीवरी धरोनी। अन् मरावे शेवटी।

(d) क्रांतीचे विद्यापीठ असलेल्या नगरीचा मी श्रमशूर नागरिक आहे. माझे हात भारताच्या प्रगतीचे रथ आहेत. मी नव्या सार्वत्रिक सुखाचा शिल्पकार, मानवतेसाठी लढणारा, मरणारा झुंजार...

(e) परंतु मी जसजसा मोठा होऊ लागलो तसतसं मला कळायला लागलं की तिच्यावर दाजी व आत्याचा धाक आहे म्हणून ती मला बोलतीया. नसता कशाला बोलली असती बिचारी.

2. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'स्मृतिस्थळ' या ग्रंथाची वैशिष्ट्ये लिहून महानुभाव संप्रदायातील त्याचे महत्त्व विशद करा. 15

(b) ''मानवी प्रवृत्तींचे भडक विडंबन 'साष्टांग नमस्कार' मध्ये कसे केले आहे'' या मताची चर्चा करा. 15

(c) 'शिळान' च्या आधारे उधव शेळके यांच्या अनुभवविश्वाचे सामर्थ्य काय आहे आणि हे अनुभवविश्व सीमित आहे का याची चर्चा करा. 20

3. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'गरिबी आणि पोरकेपणामुळे सहन कराव्या लागलेल्या सोनकांबळे यांच्या आठवणी म्हणजे साक्षात निखारे आहेत' या मताची चर्चा करा. 15

(b) शेतकऱ्यांच्या परिस्थितीत कोणती सुधारणा व्हावी असे महात्मा फुले यांना वाटते ते 'शेतकऱ्याचा आसूड' च्या आधारे लिहा. 15

(c) माझी भूमिका शिक्षकाची आहे ही केतकरांची भूमिका 'ब्राह्मणकन्या' मधून कशी व्यक्त होते ते लिहा. 20

4. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'जन हे वोळतू जेथे' मधील नायकाच्या भोवतालचे विश्व आणि त्याची संवेदनशीलता यांतील संघर्ष चित्रित करा. 15

(b) भारतीय समाजव्यवस्थेतील जाती-जाती मधील संघर्ष व तेढ बाबुराव बागुलांच्या कथेतून कशी अभिव्यक्त झाली ते लिहा. 15

(c) गौरी देशपांडे यांच्या 'एकेक पान गळावया' या कादंबरीत समाजातील स्त्रीचे शोषण कसे दाखवले आहे ते लिहा. 20

Optional Province · optionalprovince.com

SECTION—B

5. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी *150* शब्दांत रसास्वादपूर्वक विवेचन करा : 10×5=50

(a) हे मंद-मंद पद सुंदर कुंद-दंती
चाले जसा मद-धुरंधर इंद्र दंती
हंसा धरु जवळि जाय कृशोदरी ते
निष्कंप-कंकण-करासि पुढे करीते.

(b) रण काय भयानक लोळे आग जळत!
आदळती, वळती, आवळती क्रोधात
जणुं जिंकायासी गगनाचे स्वामित्व
आजाद-घनांशी झुंजे वादळ-वात!

(c) भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बरबाद झाली
हे हात माझे सर्वस्व, दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले.

(d) कुणीकडे हा झुकतो वारा!
हांका मारी जीव कुणाला!
मुक्या मनाचे मुके बोल हे
घरे पाडिती पण हृदयाला.

(e) कधी याचितों सन्; कधी स्वप्न याची,
कधी धांवतो काळ टाकून मागें.
कधी वर्णतों अमृताच्या सरी अन्
कधी मृत्युची भाबडी भीक मागें.

6. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) जगणे कठीण असल्याचा आक्रोश आणि नरकतुल्य जीवनात बेचैन झालेल्या मनाची व्यथा नारायण सुर्व्यांच्या कवितेत कशी उमटली आहे याचे विवेचन करा. 15

(b) निसर्ग आणि औदासिन्य हे बालकवींच्या अनुभवविश्वाचे महत्त्वाचे घटक त्यांच्या कवितेत कसे प्रत्यंतरास येतात ते स्पष्ट करा. 15

(c) 'विठ्ठलमाऊलीचे ठिकाणी नितांत प्रेमभावना हाच भागवतधर्म, हाच भक्तीमार्ग आणि हेच वारकरी पंथाचे रहस्य होय.' या विधानाची सार्थता संत नामदेवांच्या अभंगांच्या आधारे पटवून द्या. 20

Optional Province · optionalprovince.com

7. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) वातावरणनिर्मिती, शब्दसमृद्धी, नाट्यमयता ही रघुनाथ पंडितांच्या कलाविलासाची लक्षणे 'दमयंती स्वयंवराच्या' आधारे स्पष्ट करा. 15

(b) 'विशाखाने एक पिढी घडवली इतके ओज व तेज कुसुमाग्रजांच्या कवितेत आहे' या विधानाची चर्चा करा. 15

(c) नामदेव ढसाळांच्या सामाजिक व राजकीय जीवनातील संघर्ष 'या सत्तेत जीव रमत नाही' मधून कसा चितारला आहे ते लिहा. 20

8. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) 'मृद्‌गंध' या कवितासंग्रहातील प्रतिमांची विविधता व नाविन्य यांचे विवेचन करा. 15

(b) 'संध्याकाळच्या कविता' मधील अनुभवांचे स्वरुप स्पष्ट करुन त्या कविता दुर्बोध अर्थदृष्ट्या संदिग्ध का वाटतात ते लिहा. 15

(c) शाहिरी काव्य हे अस्सल मराठी काव्य आहे हे 'पैंजण' च्या आधारे पटवून द्या. 20

★ ★ ★

Optional Province · optionalprovince.com